प्रजावाणी 25/06/2024

# देगलुरात कारचालकाच्या टीपने २६ लाखांच्या बॅगवर डल्ला



## ▪ सीसीटीव्ही फुटेजने उघडा पडला डाव
## ▪ तीन जण जेरबंद

देगलूर (वार्ताहर), दि. २४: एका कारचालकाने मित्राला टीप देऊन मालकाच्या २६ लाखांच्या रोकड बॅगवर डल्ला मारायला लावल्याची घटना सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून उजेडात आली. या घटनेमुळे व्यापारी वर्गात एकच खळबळ माजली आहे. या नाट्यमय प्रकरणातील चालकासह तीन जण जेरबंद करण्यात आले

देगलूर येथील कृषी केंद्र व्यावसायिक तथा दालमील चालक गणेश अचिंतलवार, राजू अचिंतलवार, प्रवीण अचिंतलवार यांचे बालाजी झेंडा परिसरात निवासस्थान आहे. शनिवार व रविवार बँकेला सुट्टी असल्याने त्यांच्या व्यवसायातून जमा झालेले २६ लाख पाच हजार रुपये एचडीएफसी बँकेत भरण्यासाठी कारचालक कमलाकांत नरबागे याला राजू अचिंतलवार यांनी सांगितले.

आपल्याला बँकेत पैसे भरण्यासाठी जावे लागणार हे लक्षात आल्यावर कारचालक नरबागे याने मालकाच्या पैशावर साथीदारांच्या मदतीने डल्ला मारण्याचा बेत सकाळीच आखला. सोमवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास कार पाण्याच्या टाकीजवळ आली. तेव्हा पाठीमागून आलेल्या दुचाकीचालकाने आपली दुचाकी कारच्या पुढे लावली. अगदी सहजरीत्या चालकाच्या बाजूस असलेला दरवाजा उघडून चोरट्याने २६ लाखांची बॅग घेवून कारच्या भोवती फिरुन ते पसार झाले.

सदरील प्रकार घटना लगतच्या रहीम शेठ यांच्या सिमेंट दुकानातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाला आहे. या घटनेनंतर अचिंतलवार यांच्यासह अनेक व्यापाऱ्यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्यानंतर पोलिसांनी या परिसरातील सीसीटीव्ही तपासले. बॅगची चोरी ही कारचालकाच्या संगनमतानेच झाली हे स्पष्टपणे दिसून आले. त्यानंतर कारचालक कमलाकांत नरबागे यास पोलिसांनी ताब्यात घेऊन चौकशी केली.

अधिक तपासाअंती नरबागे याने आपणच कट रचून मित्र सचिन चंद्रकांतराव बकरे व चंद्रशेखर विठ्ठलराव मलकापूर यांची मदत घेतल्याचे सांगितले. पोनि. विश्वनाथ झुंजारे,पोकॉ. सुधाकर मलदवडे, साहेबराव सगरोळीकर, कृष्णा तलवारे यांनी सचिन बकरे , चंद्रशेखर मलकापूर (दोघेही रा. संघर्षनगर देगलूर) यांना अटक करून त्यांच्याकडून रोकडची बॅग हस्तगत केली.

## झाडाची फांदी अंगावर पडल्याने वृद्धाचा मृत्यू

अर्धापूर (वार्ताहर), दि. २४: तालुक्यातील पार्डी (म.) येथे एका शेतात झाड तोडत असताना फांदी अंगावर पडल्याने डोक्याला गंभीर जखम होऊन एकाचा जागीच मृत्यू झाला. ही घटना दि. २४ जून रोजी दुपारी दोनच्या सुमारास घडली.